# वंचित बहुजन आघाडीचे यशापयश

**प्रा. प्रकाश मारुती पवार**, उपप्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे

महाराष्ट्रातील चौदावी विधानसभेची निवडणूक ऑक्टोबर 2019 मध्ये पार पडली. ही निवडणूक महाराष्ट्र राज्यातील 288 जागांसाठी 36 जिल्ह्यांतील 305 तालुक्यांत झाली. महाराष्ट्र राज्य उत्तर प्रदेशाच्या नंतर देशातलं दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे, ज्यात लोकसभेच्या 48 जागा आहेत. एप्रिल-मे 2019च्या 17व्या लोकसभेच्या निवडणुकीच्या नंतर ही विधानसभेची निवडणूक झाली असल्याने ह्या निवडणुकीला केवळ राज्यापुरते महत्त्व नव्हते, तर देशाच्या राजकारणातसुद्धा महत्त्वाचे वलय निर्माण झाले होते. या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यावर काय काय दिसून येते, याचा विचार करू...

या निवडणुकीत लोकांनी काय विचार केला?, राजकीय पक्षांचे काय चुकले?, कोणत्या प्रश्नाला प्राधान्य मिळाले?, कोणता समाज सत्तेपासून वंचित राहिला?, कोणती धोरणे लोकांना आवडली?, कोणत्या गोष्टी लोकांना आवडल्या नाहीत?, कोणती नवीन राजकीय समीकरणे उदयाला आली?, राजकीय संस्कृतीत काय फरक पडला?, राजकीय सहभागात कोणता समूह आला?, कोणाला नाकारले, हे तपासणे राजकीय अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीत आपल्या लोकशाहीचा प्रवास कसा झाला, हेसुद्धा समजून घेणं महत्त्वाचं ठरतं. म्हणून निवडणूक ग्रामपंचायतीची असो, जिल्हा परिषदेची असो, विधानसभेची असो किंवा लोकसभेची असो... राजकीय अभ्यासकांना त्या सर्व निवडणुकींचा तटस्थपणे अभ्यास करावाच लावतो. या लेखात निवडणुकीत नव्याने उतरलेल्या 'वंचित बहुजन आघाडी' पक्षाच्या यशापयशाचा आढावा घेतला आहे.

या निवडणुकीचे विश्लेषण करण्यापूर्वी निवडणुकीच्या निकालावर नजर टाकणे आवश्यक आहे. या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांची युती होती, तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी व इतर राजकीय पक्ष यांची आघाडी होती. 1990 च्या नंतर भारताच्या राजकारणात राष्ट्रीय पक्षांना घरघर लागली. त्यांचा जनाधार मोठ्या प्रमाणात घसरत चालला आणि त्याच वेळी देशभरात प्रादेशिक अस्मिता आणि राजकारणात ही स्पर्धा निर्माण झाली. या मुद्द्यावर प्रादेशिक पक्ष मोठ्या प्रमाणात उदयाला आले, त्याला महाराष्ट्रसुद्धा अपवाद राहिला नाही. त्यामुळे 2000 च्या नंतर भारताच्या राष्ट्रीय राजकारणात यूपीए पुरस्कृत काँग्रेस पक्ष, तर एनडीए पुरस्कृत भारतीय जनता पक्ष आघाडी अशा दोन मोठ्या आघाड्या... त्याचबरोबर देशाच्या राजकारणावर तिसऱ्या आघाड्या उदयाला आल्या. त्याचे प्रतिबिंब महाराष्ट्रात उमटताना दिसते.

महाराष्ट्रात 1990 पासून भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांची निवडणुकीत आघाडी झाल्याचे दिसते. 2014ची निवडणूक वगळता 90 सालापासून ते आतापर्यंत हा सर्व विधानसभेच्या आणि लोकसभेच्या निवडणुका त्यांनी एकत्र लढल्या आहेत. त्यांना एकत्र बांधणारा धागा म्हणजे हिंदुत्व होता, त्यामुळे यांच्यामध्ये युती झालेली दिसते. या निवडणुकीमध्येसुद्धा भारतीय जनता पक्ष हा राष्ट्रीय पक्ष असल्याने त्याला केंद्रातली सत्ता मिळविण्यात जास्त रस असल्याने जागावाटपाचे एक सूत्र त्यांनी ठरवून घेतले होते की, लोकसभेच्या जास्त जागा भारतीय जनता पक्षाकडे असतील आणि विधानसभेच्या जास्त जागा ह्या शिवसेनेकडे. त्याच पार्श्वभूमीवर 1995 साली युतीची सत्ता आली तेव्हा शिवसेनेचा मुख्यमंत्री झाला, हे सर्व अंडरस्टँडिंग दोन्ही राजकीय पक्षांमध्ये होतं. पण 2014 साली भारतीय जनता पक्षाला मोदींच्या नेतृत्वाखाली जे नेत्रदीपक यश मिळालं... त्यानंतर मात्र त्यांनी आपल्या सहकारी पक्षांना टाचण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे देशभरात वरवर जरी एनडीए आघाडी दिसत असली तरीही या आघाडीत तणाव कायम

जाणवत होता. त्याला महाराष्ट्रही अपवाद नव्हता. म्हणूनच 2014 ची निवडणूक शिवसेना-भाजप यांनी स्वतंत्र लढली; पण नंतर मात्र शिवसेनेने भारतीय जनता पक्षाला पाठिंबा देऊन सत्तेत सहभाग घेतला.

शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष जरी सत्तेत एकत्र असले, तरी त्यांच्यामध्ये खूप मोठा तणाव होता आणि मुख्यतः या निवडणुकीच्या वेळी जागावाटप होताना भारतीय जनता पक्षाला असं वाटत होतं की, 2014 च्या विधानसभेच्या निवडणुकीत आम्हाला 125 जागा मिळाल्या होत्या, तर लोकसभेच्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेस-राष्ट्रवादी यांचं पानिपत केले होते. या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला दोन जागांवर समाधान मानावे लागले होते, तर राष्ट्रवादी काँग्रेसला चार जागा आणि त्यातील दोन जागा ह्या पवार कुटुंबीयांमधल्या होत्या. पाच वर्षे सत्तेत असल्याने आणि मोठ्या प्रमाणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस पक्षातील नेते भारतीय जनता पक्षाकडे आकर्षित झाल्याने, त्यांनी पूर्वीचे सूत्र बदलून विधानसभेच्या जास्तीत जास्त जागा आपल्याकडं मिळाव्यात यासाठी रणनीती आखली, तर शिवसेनेला ही अडचण वाटायला लागली. त्यातून त्यांच्यात तणाव दिसत होता. पण जरी असं असलं तरी त्यांनी 144-144 असा फॉर्म्युला स्वीकारला आणि या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला 105 जागा मिळाल्या, तर शिवसेनेला 56 जागा मिळाल्या. या दोन्ही राजकीय पक्षांच्या युतीमुळे राज्यात पुन्हा युतीचं सरकार निर्माण होईल, असे संकेत मिळू लागले

2014 च्या निवडणकीच्या पार्श्वभूमीवर तपासलं तर भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांना मिळालेले यश हे फारसे चांगले नाही. 2014 च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला 122 जागांवर, तसेच तीन बंडखोर उमेदवारांना निवडून आणण्यात यश मिळालं होतं. पण आता मात्र भारतीय जनता पक्षाला फक्त 105 जागा मिळाल्या. म्हणजे मागच्या निवडणुकीपेक्षा त्यांच्या 20 जागा घटल्या होत्या. याचा अर्थ असा की, लोकांनी भारतीय जनता पक्षाला पूर्वीचा आकडा गाठू दिला नाही. तीच परिस्थिती शिवसेनेचीसुद्धा आहे. 2014 च्या निवडणुकीमध्ये शिवसेनेला 63 जागा मिळाल्या होत्या. शिवसेना स्वतंत्रपणे लढली होती. पण 2019 साली शिवसेनेने पूर्वीपेक्षा जास्त जागा लढवूनसुद्धा शिवसेनेला 56 जागा मिळाल्या. म्हणजे शिवसेनेच्या 7 जागा कमी झाल्या. 2014च्या निवडणुकीच्या तुलनेत 2019 च्या निवडणुकीत शिवसेना-भारतीय जनता पक्ष आपल्या जागा वाढू शकले नाहीत. उलट त्या जागांमध्ये घट झाली. या निवडणुकीत अतिशय बेदखल झालेला काँग्रेस पक्ष आणि सत्तेशिवाय जगणं मुश्किल झालेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अस्वस्थ होता. 2014च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला 42 जागा मिळाल्या होत्या, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 41 जागा. 2019 च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला 44 जागा मिळाल्या, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 54 जागा मिळाल्या. अर्थात, काँग्रेसच्या जागांमध्ये दोन जागा वाढल्या, तर राष्ट्रवादीच्या 11 जागा वाढल्या. खरं म्हणजे हे दोन्ही पक्ष राज्यात विरोधक होते, पण त्यांनी मागील पाच वर्षांत विरोधी पक्ष म्हणून जे काम राज्यात करायला पाहिजे होते, ते त्यांनी केले नाही. तरीसुद्धा या पक्षाच्या मतांमध्ये वाढ झाली.

या निवडणुकीचे अजून एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नव्याने उदयाला आलेले वंचित बहुजन आघाडी आणि एमआयएम या राजकीय पक्षांच्यामुळे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांना 24 जागा गमवाव्या लागल्या.

## वंचितमुळे काँग्रेस-राष्ट्रवादी सत्तेपासून वंचित

लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी महाराष्ट्राच्या राजकारणात वंचित बहुजन आघाडी प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली उदयाला आली. 20 मार्च 2018 रोजी ह्या पक्षाची स्थापन झाली. वास्तविक पाहता प्रकाश आंबेडकर हे महाराष्ट्राच्या राजकारणात 1980 सालापासून सक्रिय आहेत. डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांनी 5 डिसेंबर 1956 रोजी राम मनोहर लोहिया, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, प्र. के. अत्रे यांना पत्र लिहून रिपब्लिकन पक्ष स्थापनेचे सुतोवाच केले होते आणि त्यानंतर लगेचच बाबासाहेब आंबेडकर यांचे महानिर्वाण झाले. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील पक्ष म्हणून ऑक्टोबर 1957 सालात महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली. या पक्षात शेड्युल कास्ट फेडरेशन विलीन झाला आणि 1957 सालापासून तो महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावशाली दिसू लागला. नेतृत्व स्पर्धा आणि संसदीय राजकारणाच्या आकलनाच्या मर्यादांमुळे रिपब्लिकन पक्षात अनेक गट पडले. त्यातल्या एका गटाचा आधार घेऊन प्रकाश आंबेडकर यांनी त्यांच्या राजकीय जीवनाला सुरुवात केली. 1984 मध्ये त्यांनी विदर्भातील अकोला लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढवली आणि अतिशय कमी मतांनी त्यांचा पराभव झाला. त्यानंतर अकोला जिल्हा परिषद, पंचायत समिती बांधणी करून अकोला पॅटर्न पुढे आणून बहुजनवादी राजकारण करण्यास सुरुवात केली. त्यांनी बहुजन महासंघ आणि भारिप यांच्या एकत्रित सामाजिक अभियांत्रिकी प्रक्रियांमधून हा पक्ष पुढे जात होता. पक्षीय मर्यादा लक्षात आल्यानंतर व्यापक दलित बहुजनांचे राजकारण केले.

2014 मध्ये राज्यात भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेची सत्ता आल्याने दलितांना असुरक्षितता वाटली. दलितांवर अत्याचार वाढले होते. याच पार्श्वभूमीवर 1 जानेवारी 2018 रोजी भीमा कोरेगाव या ठिकाणी जातीयवाद्यांनी भीषण अशी दंगल घडविल्याने दलित समूहांनी गटातटाचे राजकारण सोडून प्रकाश आंबेडकरांना साथ दिली. प्रकाश आंबेडकर हे एका बाजूला महाराष्ट्राचा दलित समाज आणि दुसऱ्या बाजूला भटके-विमुक्त समुदायाला जोडत होते आणि त्याच पार्श्वभूमीवर लोकसभेच्या निवडणुकीत त्यांना जवळपास 40 लाख मते मिळाली. खरं म्हणजे त्यावेळी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची आघाडी झाली असती, तर लोकसभेचे महाराष्ट्रातील निवडणुकीचे निर्णय वेगळे दिसले असते. ती आघाडी लोकसभेच्या वेळी झाली नाही आणि पुढे विधानसभेच्या वेळीसुद्धा झाली नाही. याचा फटका मात्र काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठ्या प्रमाणात बसला. वंचित बहुजन आघाडीचे दहा उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर, तर काँग्रेस-राष्ट्रवादीचे 24 उमेदवार हे वंचित बहुजन आघाडीमुळे पराभूत झाले. मात्र जर काँग्रेस-राष्ट्रवादी आणि वंचित बहुजन आघाडी एकत्र असते तर 10 + 24 अशा 34 जागा वाढल्या असत्या. म्हणजे शिवसेना-भारतीय जनता पक्ष यांच्या खात्यातील 34 जागा कमी झाल्या असत्या आणि भारतीय जनता पक्ष तीनआकडी संख्या पार करू शकले नसता; तर शिवसेना 35-40 जागांपर्यंतच अडकून पडली असती. त्यामुळे महाराष्ट्रात हिंदुत्ववाद्यांच्या राजकारणाला नियंत्रण घालता आले असते. परंतु ही आघाडी न झाल्यामुळे भाजप आणि शिवसेना हे पक्ष सत्तेच्या शिखरापर्यंत पोहोचले.

ह्या निवडणुकीकडे सामाजिक संस्कृती दृष्टीने पाहिले पाहिजे. या निवडणुकीत जर युती झाली असती तर महाराष्ट्रात सध्याचे जे प्रतिगामित्व वाढलेले आहे, ते रोखता आले असते. या निवडणुकीचा पहिला परिणाम धर्मनिरपेक्षतेचे राजकारण बळकट करण्यात झाला असता आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिवसेना-भाजपला काँग्रेस-राष्ट्रवादी सत्तेपासून दूर ठेवू शकले असते आणि महाराष्ट्रात सत्तांतर घडलं असतं. त्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेसचे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक उमेदवार वंचितमुळं काँग्रेस-राष्ट्रवादी सत्तेपासून वंचित राहिली, असं म्हणू लागले.

## वंचित आघाडी सत्तेपासून वंचितच राहिली

लोकसभेच्या निवडणुकीत बहुजन वंचित आघाडी ही ओवेसी यांच्या एमआयएम पक्षाबरोबर होती. या निवडणुकीत वंचित आघाडीला अतिशय चांगली मते मिळाली. या निवडणुकीतच औरंगाबादमध्ये

एमआयएम पक्षाला एक जागा मिळाली. त्यामुळे महाराष्ट्राच्या भावी राजकारणात एमआयएम आणि वंचित आघाडीमुळे काही सकारात्मक बदल होतील, अशी आशा व्यक्त करण्यात आली. त्या पार्श्वभूमीवर वंचित आणि काँग्रेस-राष्ट्रवादी यांनी युती करावी, जागावाटपाच्या वाटाघाटी कराव्यात, असे धर्मनिरपेक्ष राजकारण करणाऱ्या लोकांना वाटत होते. यातून पुरोगामी राजकारण हे पुढे जाणारे होते; परंतु लोकसभेच्या निवडणुकीनंतर ज्या पद्धतीने व तिच्या नेतृत्वाने राजकारण करायला पाहिजे होतं, ते झालेले दिसत नाही. लोकसभा निवडणूक वंचित आघाडीने एमआयएमबरोबर लढल्यामुळे स्वाभाविकपणे विधानसभेच्या निवडणुकीतसुद्धा ते एकत्र असतील, अशी सर्वांना आशा वाटत होती; पण प्रत्यक्ष जागावाटपाच्या प्रश्नांवरून ही युती तुटली. वंचित आघाडीने एमआयएमला फक्त आठ जागा देण्याचे मान्य केले. त्यामुळे जागावाटपावरून ही युती तुटली. 2014 च्या निवडणुकीत एमआयएमला दोन विधानसभेच्या जागा मिळाल्या होत्या, तर पाच ठिकाणी ते दुसऱ्या क्रमांकावर होते आणि राज्यातील विविध महानगरपालिका, नगर परिषदांमध्ये एमआयएमचे 125 नगरसेवक होते, त्यामुळे वंचितने देऊ केलेल्या आठ जागा त्यांना मान्य न झाल्यामुळे त्यांनी वंचित बरोबरची जागावाटपाची बोलली थांबवून टाकली.

प्रकाश आंबेडकर यांच्या पक्षाने एमआयएमबरोबर आघाडी केल्याने काँग्रेसची अडचण झाली, तर बहुजनामधील हिंदू मतदार हा दूर गेला, त्याच वेळी एमआयएम आणि वंचित ही बीजेपीची बी टिम आहे, असा आरोप काँग्रेस पक्षाकडून झाला. त्यामुळे लोकसभेत मिळालेल्या मतांच्या तुलनेत वंचित बहुजन आघाडीच्या विधानसभेच्या मतांमध्ये घट झाली आणि वंचित समाजाला सत्तेच्या दिशेने नेणारं एक स्वप्न दिसत होतं ते अपूर्णच राहिले. या निवडणुकीतही वंचित बहुजन आघाडी सत्तेपासून वंचितच राहिला, पण या निवडणुकीच्या माध्यमातून काही महत्त्वाची गोष्टी दिसून आली, ती म्हणजे दलित, भटक्या, विमुक्त, ओबीसी जाती यांना एकत्र करून जर राजकारण केले, तर त्यामुळे प्रस्थापित राजकारणाला धक्का बसवता येतो.

## स्वाभिमान की सत्ता ?

महाराष्ट्रातील आणि देशभरातील दलित नेतृत्व समुदायापुढे एक पेच कायम आहे, तो म्हणजे स्वाभिमानाचे राजकारण करायचं की लाचारी करून सत्तेचे तुकडे स्वीकारायचे? भारतातील काँग्रेस, भारतीय जनता पक्ष आणि इतर राजकीय पक्षांमध्ये वरिष्ठ जातीय नेतृत्वाचं वर्चस्व आहे. ते मागासलेल्यांना सत्तेच्या केंद्रस्थानी येऊ देत नाहीत. त्यामुळे भारतीय राजकारणात वरिष्ठ जात विरुद्ध मागासलेली जात, असा संघर्ष होताना दिसतो. मागासलेल्या जातीकडे साधनांचा अभाव आहे. त्या असंघटित आहेत. त्या तुकड्या तुकड्यात विभागलेल्या आहेत आणि मुख्य म्हणजे त्यांच्यामध्ये सत्ता मिळविण्याचा आत्मविश्वास नाही. त्यामुळे निवडणुकीच्या काळात त्यांना प्रस्थापित राजकीय पक्षांकडे भागीदारी मागावी लागते. यांना ज्या राजकीय पक्षांच्या ध्येयधोरणांचा, विचारसरणीच्या विरोधात राजकारण करायचे असते, त्याच राजकीय पक्षाच्या बरोबर सत्तेसाठी वाटाघाटी करून लाचारी पत्करावी लागते. त्यामुळे "नको लाचारी नको, स्वाभिमानाने जाऊ" असा प्रवाह मांडणारा एक समुदाय हा महाराष्ट्रात आंबेडकरी विचारांचा आहे. या समुदायाचा पाठिंबा प्रकाश आंबेडकरांना मिळताना दिसतो, तर सत्तेच्या वळचणीला जाऊन काही प्रश्न सोडवता येतील, असा विचार करणारा एक समुदाय रामदास आठवले यांच्याबरोबर आहे. त्यामुळे 'सत्ता की स्वाभिमान?' हे न उलगडलेले कोडे आहे. खरं म्हणजे दोन्ही एकमेकांना पूरक आहेत. दोघांचीही सांगड घालण्यात नेतृत्वाला यश मिळायला पाहिजे. सत्ता मिळविण्यासाठी दलित राजकीय पक्षांना युती किंवा आघाडी केल्याशिवाय पर्याय नाही... पण ही युती निवडणुकीपुरतीच मर्यादित आहे. निवडणुकीच्या पलीकडे

स्वतंत्र असे राजकीय निर्णय घेणे आवश्यक आहे, ते महाराष्ट्रातील दलित राजकीय पक्ष घेताना दिसत नाहीत.

**संदर्भ-**

१. बंगाळे श्रीकांत, 'प्रकाश आंबेडकर- वंचित बहुजन आघाडीने विधानसभा निवडणुकीत काय केले?', बीबीसी मराठी , 27 ऑक्टोबर 2019.

२. संपादकीय, 'एमआयएमने का तोडले वंचित आघाडीशी नातं?', बीबीसी मराठी, 6 सप्टेंबर 2019.

३. पळशीकर सुहास, 'प्रकाश आंबेडकर ओबीसी चलाखी फायदा आणि मोठे धोके', बीबीसी मराठी, 8 ऑक्टोबर 2019.

४. फाटक पराग, 'आंबेडकर ओबीसीचा दलित मुस्लिम युतीचा डाव आणि राजकीय पेच ', बीबीसी मराठी, 17 सप्टेंबर 2018.

५. खोरे अरुण, 'भीमा कोरेगाव- प्रकाश आंबेडकर दलितांचे राज्यव्यापी नेते होऊ शकतात का?', बीबीसी मराठी, 5 जानेवारी 2018.

६. पवार प्रकाश, 'वंचितमुळे काँग्रेस आघाडी की काँग्रेस मुळे वंचित सत्तेपासून वंचित?', शिक्षक संघटक, अंक दहावा, नोव्हेंबर 2019, पान क्र.७.